Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
५३९, राजेंद्रनगर,
कोल्हापूर - ४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/इ.१० वी गोपनीय/प्रा.प. २०२६ / 143
दिनांक - ०१.०१.२०२६
12 JAN 2026

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) फेब्रुवारी-मार्च २०२६ लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रक व सूचनाबाबत...**

**संदर्भ : १. राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा - ६ /३६९७ दिनांक ३१/१०/२०२५ चे पत्र.**
**२. राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/३९४६ दिनांक १७/११/२०२५**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ |
| २ | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची व पूर्व व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ |
| ३ | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा [ फक्त अंध,मुकबधिर,बहुविकलांग ] | सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ |
| ४ | लेखी परीक्षा | शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दिनांक १८ मार्च २०२६ |
| ५ | आउट ऑफ टर्न परीक्षा (प्रात्य.श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ) | शुक्रवार दि. २० मार्च २०२६, सोमवार दि. २३ मार्च २०२६ व मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६ |
| ६ | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | शुक्रवार दिनांक २० मार्च २०२६ ते गुरूवार दिनांक ०२ एप्रिल २०२६ |

**परीक्षेसंदर्भात महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे : -**

१. प्रात्यक्षिक परीक्षा निर्धारित कालावधीत पार पाडण्याच्या दृष्टीने शाळेतील परीक्षार्थींची संख्या व प्रयोगशाळा क्षमतेनुसार परीक्षार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेवून त्याप्रमाणे परीक्षांचे नियोजन/वेळापत्रक तयार करण्यात यावे.प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत शाळाना भेटी देण्याकरिता भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्या अनुषंगाने दिनांक निहाय तयार केलेल्या वेळापत्रकाची एक प्रत विभागीय मंडळ कार्यालयाकडे सादर करावयाची आहे.

२. विज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या माहितीनुसार आपल्या शाळेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. काही अपरिहार्य कारणास्तव एखादा परीक्षक नियोजित वेळेत उपस्थित रहाणार नसल्यास नजीकच्या शाळेतील विषय शिक्षकाची परीक्षक म्हणून नेमणूक करण्यास हरकत नाही तथापि यासाठी मंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

**३. फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेपासून प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरले आहेत. याबाबत प्रत्यक्ष करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सर्वसाधारण सूचनांची अमंलबजावणी गतवर्षी प्रमाणेच करण्यात येत आहे. त्यापध्दतीनेच यावर्षी ऑनलाईन गुण अचूक नोंदविण्यात यावेत.**

४. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यशिक्षण विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार शालेय स्तरावर आयोजित करण्यात याव्यात. एकाच दिवशी व एकाच वेळी दोन कार्यशिक्षण विषयाची परीक्षा घ्यावी लागणार नाही अशा प्रकारे परीक्षांचे नियोजन करावे.

५. वेळापत्रकाप्रमाणे आयोजित केल्या जाणा-या परीक्षा संदर्भातील माहिती म्हणजेच पेपरचा दिनांक , वार, वेळ, विषय व विषय कोड इ. बाबतच्या सर्व सूचना परीक्षेपूर्वी सर्व संबंधित परीक्षार्थ्यांना त्याची माहिती देण्यात येवून शाळेच्या सूचनाफलकावर स्पष्टपणे निदर्शनास येतील अशी प्रसिध्दी दयावी व प्रात्यक्षिक परीक्षा विहित कालावधीत पार पाडण्याची जबाबदारी संबंधीत माध्यमिक शाळांची राहील.

६. विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेशपत्रावर लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा क्रमांक आणि केंद्र शाळेचे नांव ठिकाण नमूद केलेले असते आणि त्याप्रमाणे परीक्षेपूर्वी संबंधित केंद्राशी संपर्क साधणेबाबत सर्व परीक्षार्थीना सूचना देण्यात याव्यात.

७. वेळापत्रकप्रमाणे परीक्षार्थीने प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी ३० मिनीटे अगोदर म्हणजेच सकाळच्या सत्रात सकाळी १०.३० वाजता व दुपारच्या सत्रात दुपारी २.३० वाजता परीक्षा दालनात हजर रहाणे आवश्यक आहे. या वेळेनंतर परीक्षा दालनात प्रवेश दिला जाणार नाही आणि त्याअनुषंगाने परीक्षाकेंद्रावर वेळेत हजर रहाण्याबाबत सर्वांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.
**शासन निर्णय क्रं.संकीर्ण /२०१७/[११८/१७] / एसडी ६ / दि.१६ ऑक्टोंबर २०१८ प्रमाणे सर्व पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमानुसार लेखी परीक्षेसाठी प्रत्येक पेपरला प्रतीतास २० मिनीटे जादा वेळेची सवलत देय असेल तथापि त्यासाठी दिव्यांगाच्या विहीत प्रमाणपत्रासह प्रस्ताव विभागीय मंडळ कार्यालयाकडे सादर करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.**

८. अतिवंलब शुल्काने आवेदन भरलेल्या व गुणाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये ज्या विद्यार्थ्याचे अतिरिक्त बैठक क्रमांक उपलब्ध झालेले नाहीत अथवा विषय बदल केला आहे अशा सर्व विद्यार्थ्याचे गुण खाली नमुद केलेल्या विहीत नमुन्यात स्वतंत्र सिलबंद पाकिटातून देण्यात यावे.

**<u>अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल झालेल्या बैठक क्रमांकासाठी</u>**

**** शाळेच्या लेटर हेडवर स्वतंत्ररित्या गुणतक्ते तयार करावयाचा नमुना**

| माध्यमिक शाळा सांकेतिक क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय कोड | बैठक क्रमांक | मिळालेले गुण | |
| | | | | अंकात | अक्षरात |
| १ | | | | | |
| २ | | | | | |

९. परीक्षार्थीनी आपल्या मुख्य आणि पुरवणी उत्तरपत्रिकेवरील तसेच आलेख , नकाशा पुरवणी वरील विहीत जागेवरच आपला बैठक क्रमांक अक्षरी व अंकी बिनचूक लिहावा.विहीत जागेशिवाय अन्य कोठेही आपला बैठक क्रमांक लिहिण्यास सक्त मनाई आहे आणि याचे उल्लंघन केल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर मंडळ शिक्षासूची नुसार कारवाई करण्यात येईल या संदर्भात सर्व विद्यार्थ्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

१०. **<u>महत्वाचे</u> : मंडळाने निर्धारित केलेल्या परीक्षा कालावधीत परीक्षार्थी वैद्यकीय कारणास्तव अथवा काही अन्य अपरिहार्य कारणास्तव प्रात्यक्षिक,तोंडी,अंतर्गत मुल्यमापन इ. परीक्षा देवू शकला नाही तर अशा परीक्षार्थीसाठी OUT OF TURN मध्ये परीक्षा देता येणार असून OUT OF TURN द्वारे परीक्षा घ्यावयाचा कालावधी दि.20/03/2026, 23/03/2026 व 24/03/2026 असा निर्धारित केलेला आहे. या कालावधीतच परीक्षा घेण्यात यावी. यासाठी या तारखेपूर्वी प्रती विषय रुपये १००/- चलनाद्वारे बँकेत भरणे आवश्यक राहिल. या परीक्षांचे गुण ही ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत.**

११. नियमित प्रात्यक्षिक,तोंडी परीक्षा दिलेले विद्यार्थी यांचे तसेच आऊट ऑफ टर्नने प्रविष्ठ झालेले विद्यार्थी यांचे गुणतक्ते व सर्व साहित्य वितरण केंद्रावर जमा करणेबाबतची तारीख मंडळाच्या संकेतस्थळावरुन यथावकाश कळविण्यात येईल.

१२. ऑनलाईन पध्दतीने भरलेले विषयनिहाय सर्व गुणतक्ते मंडळाने पुरविलेल्या एकाच सिलबंद पाकिटामध्ये विषयनिहाय बंच करून देण्यात यावे. श्रेणी लिस्ट पाकिट स्वतंत्ररित्या जमा करावे.

वरील सर्व सूचनांच्या अनुषंगाने मुख्याध्यापकानी व्यक्तीश: लक्ष घालून परीक्षा सुरळीत पार पाडणेकामी मंडळास सहकार्य करावे.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 12-01-2026 12:41:57

**(सुभाष रा. चौगुले )**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**